महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या अनुदानित, मतिमंद बालगृह संलग्नीत शाळा/ कर्मशाळेतील प्रवेशितांना रु. २०००/- प्रमाणे परिपोषण अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक - इडीडी २०१७/ प्र.क्र. २५०/अ.क.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०१ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक इडीडी-२०१२/प्र.क्र. २७६/अ.क. १, दि. २२.०६.२०१५
२) शासन निर्णय क्रमांक विभशा-२०१०/प्र.क्र.६/विजाभज २, दि. ०१.०३.२०१६
३) मा.मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. १८२/२०१०.
४) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. अकआ/प्र-४ मति/परिपोषण/ अनुदान वाढ/ जनहित याचिका /१८२/२०१०/२०१७-१८/०७, दि.१२.०५.२०१७.

प्रस्तावना:-

महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील १४ अनुदानीत व ५ विनाअनुदान तत्वावरील बालगृहे या विभागाकडे दि. ३०.०५.२०१२ च्या शासन निर्णयान्वये हस्तांतरीत करण्यात आली आहेत. शासन निर्णय दि. २२.०६.२०१५ अन्वये सदर मतिमंद बालगृहांना वेतन, वेतनेत्तर अनुदान, नियमानुसार अनुज्ञेय इमारत भाडे तसेच, दरडोई, दरमहा रु.९९०/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणारे परिपोषण अनुदान वाढवून देण्यासंदर्भात शिफारस करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची नेमणूक करण्यात आली आहे.

उपरोक्त बालगृहांबाबत मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. १८२/२०१० (मुंबई मिरर विरुध्द महाराष्ट्र शासन) दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेवर मा.मुंबई उच्च न्यायालयाने परिपोषण अनुदान सुधारणेबाबत शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत मतिमंद बालगृहांना दरडोई दरमहा रु. २०००/- या दराने परिपोषण अनुदान देण्याबाबत दि. ७.४.२०१७ रोजी आदेश दिले आहेत.

मतिमंद बालगृहांतील प्रवेशितांची घ्यावी लागणारी विशेष काळजी आणि त्यांच्या वैद्यकिय उपचारावरील खर्च विचारात घेवून अन्य बालगृहातील प्रवेशितांपेक्षा मतिमंद बालगृहातील प्रवेशितांना अधिक दराने परिपोषण अनुदान देण्यात येते. मा.मुंबई उच्च न्यायालयाने आदेशित केल्यानुसार उक्त १४ बालगृहांतील प्रवेशितांना, परिपोषण अनुदान सुधारीत करण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीचा निर्णय होईपर्यंत, एप्रिल,२०१७ पासून रु. २०००/- या दराने परिपोषण अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या अनुदानीत मतिमंद बालगृहे संलग्नीत शाळा/कर्मशाळा या चौदा संस्थांमधील प्रवेशितांना परिपोषण अनुदान सुधारित करण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीचा निर्णय होईपर्यंत एप्रिल,२०१७ पासून प्रतिमाह, प्रतिप्रवेशित रु.२०००/- या दराने परिपोषण अनुदान देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १८१/२०१७ दि. १८.१०.२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११०११५३६४८५५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2017.11.01 15:23:16 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
२) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
४) सचिव (सा.न्या.) मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे.
६) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.
७) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०) निवड नस्ती, अपंग कल्याण-१.
११) संग्रह नस्ती, अपंग कल्याण-१.